निवडक



नागेशी बांदोडा येथे श्री नागेश महारुद्र संस्थानात महाशिवरात्री उत्सवनिमित्त हजारो भाविकांची हजेरी लावली. महारुद्र शिबिकोत्सव, रथोत्सव, गंगापूजन, आरती महाप्रसाद असे बरेच कार्यक्रम, भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात महाशिवरात्र रंगली.



मोरजी : यशवंत विद्यार्थ्यांसमवेत शिक्षकवर्ग.

## मोरजी पंचायतन कला संस्थेच्या स्पर्धेत विद्याप्रसारकचे यश

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २८ : मोरजी पंचायतन कला संस्थेने आयोजित केलेल्या पेडणे तालुका मर्यादित प्राथमिक गट समुद्रावरती वाळूच्या साहाय्याने ऐतिहासिक किल्ला बनवण्याच्या स्पर्धेत मोरजी येथील विद्याप्रसारक प्राथमिक विद्यालयातील 'लव' गटातील सौरभ सुदीप शेटगावकर, तनय प्रशित मोरजकर, राज राजू शेटगावकर, मनस्वी फुटूसिंग शेटगांवकर आणि स्वरज्ञा राजेश पुर्खे यांना प्रथम बक्षीस प्राप्त झाले.
तसेच 'ध्रुव' गटातील सत्यम सुरजदेव ठाकूर, पूर्वी जयप्रसाद चोडणकर, विघ्नेश सुहास मेस्त्री, यशीत केदार चंद्रोजी आणि विशाल शंकर लमाणी यांना द्वितीय उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक शुभम चंद्रकांत साळगांवकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप मेथर, विद्याप्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष गणेश शेटगांवकर, पालक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष रोशन शेटगांवकर, विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

---

## काणकोण जेष्ठ नागरिक मंचातर्फे उद्या क्रीडा मेळावा

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २८ : काणकोण ज्येष्ठ नागरिक मंचतर्फे रविवार दि. २ मार्च रोजी, काणकोणमधील ज्येष्ठ नागरिकांसाठी काणकोण तालुका पातळीवर क्रीडा मेळावा आयोजित करण्यात आला असून हा मेळावा तिन गटात होणार आहे. या क्रीडा मेळाव्यात ६० ते ६४ वर्षे, ६५ ते ६९ वर्षे आणि ७० वर्षावरील वयोगट असे असणार असून या मेळाव्यात काणकोणमधील ज्येष्ठ नागरिकांना सहभागी होता येईल. हा मेळावा खुल्या प्रकारात घेण्यात येईल. सहभागी स्पर्धक हे काणकोण जेष्ठ नागरिक मंचचे सभासद असायलाच हवेत असे नाही. विजेत्यांना आकर्षक चषक, पदक आणि प्रमाणपत्र देण्यात येईल. त्याच बरोबर सर्व सहभागी स्पर्धकाना पदक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. हा मेळावा चावडीवरील सरकारी कार्यालय संकुलाजवळील गायतोंडे मैदानावर सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होईल. काणकोण नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष आणि चावडी प्रभागाचे विद्यमान नगरसेवक रमाकांत नाईक गावकर यांनी हा मेळावा पुरस्कृत केला असून काणकोण नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सारा नाईक देसाई या प्रमुख पाहुण्या तर रमाकांत नाईक गावकर हे विशेष अतिथी म्हणून या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात सहभागी स्पर्धकांना सकाळी चहापानाची आणि दुपारी जेवणाची ही व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात येईल. काणकोण मधील ज्येष्ठ नागरिकांनी या मेळाव्यात सहभागी होऊन हा मेळावा यशस्वी करण्याचे आवाहन काणकोण ज्येष्ठ नागरिक मंचचे अध्यक्ष ग्लेर्म मार्टिन यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मेळाव्याचे निमंत्रक श्री दिलखुश शेट ९९२३४८७९७३ आणि श्री अनिल फळ देसाई ८५५४०५९३५६ यांच्याशी संपर्क करावा, असे कळविण्यात आले आहे.

---

## विष्णू स्मृती प्रतिष्ठानतर्फे उद्या चित्रकला स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २८ : विष्णू स्मृती प्रतिष्ठान गोवातर्फे रविवार दि. २ रोजी श्री नवदुर्गा सभा मंडप देऊळवाडा पाळी येथे सकाळी ९ ते १० यावेळेत 'सृष्टी रंगोत्सव २०२५' कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेनंतर लगेचच बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होईल. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पांडुरंग सावंत उपस्थित रहाणार आहेत. अधिक माहितीसाठी ९८२३९५१२३५ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

---

## तोर्से हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्यावतीने मोपा येथे शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना मानवंदना देण्याचा कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २८ : तोर्से हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्यावतीने मोपा पेडणे येथील नारायण मोपकर सभागृहात शहीद भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांना मानवंदना देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात शहीदांच्या जीवनावर कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा आणि शौर्य गीत गायन स्पर्धा होणार आहेत. उगवे तांबोसे मोप तोर्से या भागातील इ. ७ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके आणि सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक रुपाने बक्षिसे देण्यात येतील. कार्यक्रम सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत चालेल.
तोर्से हायस्कूलच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात येत आहे. सर्वांच्या चहापानाची आणि दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्यांनी एकनाथ महाले ९२८४८३२७६९, मधुकर गवंडी ९७६४३९२९२०, श्रीकांत पाटील ९४२१२५५५३९ यांच्याशी संपर्क साधावा.

# अफगाणिस्तान- ऑस्ट्रेलिया सामना पावसामुळे रद्द


### प्रत्येकी एक- एक गुण | ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीसाठी पात्र

लाहोर, दि. २८ :

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलच्या दृष्टीने अफगाणिस्तान–ऑस्ट्रेलिया सामना खूप महत्त्वाचा होता. या सामन्याचा विजेता संघ ब गटातून चॅम्पियन्स ट्रॉफी उपांत्य फेरीत जाणारा पहिला संघ ठरणार होता. पण अफगाणिस्तानची फलंदाजी झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या डावात १२ षटके होताच पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे सामना रद्द करण्यात आला.

अफगाणिस्तान ऑस्ट्रेलियाचा सामना पाऊस पडल्याने रद्द करण्यात आला. पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर बराच वेळ थांबून मैदान सामन्यासाठी पुन्हा तयार होते की नाही, याचे पंचांनी निरिक्षण केले. पण लाहोरच्या या मैदानावर प्रचंड पाणी असल्याने सामना रद्द करण्यात आला. भारतीय वेळेनुसार रात्री ९.२० वाजता पंचांनी सामना रद्द केल्याची घोषणा केली. या निकालाचा अर्थ ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला. त्याचवेळी अफगाणिस्तान संघ अजूनही उपांत्य फेरीत पोहोचू शकतो.

ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीत पोहोचला असला तरी अफगाणिस्तानची उपांत्य फेरी गाठण्याची शक्यता अजूनही कायम आहे. सामना पावसामुळे रद्द झाल्याने दोन्ही संघांना एक–एक गुण मिळाला. ऑस्ट्रेलिया सर्वाधिक ४ गुणांसह पात्र ठरली, तर अफगाणिस्तानचा संघ ३ गुण तर दक्षिण आफ्रिकेचा संघही ३ गुणांसह शर्यतीत आहे. त्यामुळे आता अफगाण संघाला आता उद्या म्हणजेच १ मार्च २०२५ रोजी इंग्लंडने विजय मिळवावा अशी अपेक्षा असेल, जेणेकरून दक्षिण आफ्रिकेचा रन रेट कमी होईल आणि टेम्बा बावुमाचा संघ तिसऱ्या स्थानावर घसरेल.



तत्पूर्वी, पावसामुळे सामना थांबवण्यात आला तेव्हा ऑस्ट्रेलियाने २७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना १२.५ षटकात १ बाद १०९ धावा केल्या होत्या. ट्रॅव्हिस हेड जबरदस्त फॉर्मात होता. त्याने ४० चेंडूत ९ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ५९ धावा केल्या होत्या. अफगाणिस्तान संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

ऑस्ट्रेलियाने सामन्यात दणक्यात सुरूवात केली, पण अफगाणिस्तानने हार मानली नाही आणि शेवटपर्यंत उत्कृष्ट फलंदाजी करत २७३ धावांची सन्मानजनक धावसंख्या उभारली. सदिकउल्ला अटलने ९५ चेंडूत ३ षटकार आणि ६ चौकारांच्या मदतीने ८५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यानंतर संघाचा अष्टपैलू खेळाडू अजमतुल्ला ओमरझाईने वादळी खेळी केली आणि संघाची धावसंख्या २५० पार नेऊन ठेवली. ओमरझाईने ६३ चेंडूत ५ षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने ६७ धावा केल्या. ब गटात अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिका अजूनही उपांत्य फेरीच्या शर्यतीत आहेत, तर बुधवारी २६ फेब्रुवारी रोजी अफगाणिस्तानकडून पराभूत होऊन इंग्लंड स्पर्धेतून बाहेर पडला. यामुळे त्यांचा कर्णधार जोस बटलरने शुक्रवारी २८ फेब्रुवारी २०२५ रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या स्पर्धेच्या अंतिम सामन्याच्या एक दिवस आधी कर्णधारपदाचा राजीनामा दिला.

# जादूगार जितेंद्र रघुवीर नवीन जादूसह गोव्यामध्ये!

■ टीम दैनिक हेराल्ड



– शनिवारी, रविवारी आणि सोमवारी ३ खास शो वास्को, मडगाव आणि पणजीत

पणजी, दि. २८ : होम मिनिस्टर, सुर नवा ध्यास नवा, कॉमेडी एक्सप्रेस, इझ माझा कट्टा, खाली डोकं वर पाय, आम्ही सारे खवय्ये, खुपते तिथे गुप्ते आणि चला हवा येऊ द्या वर गाजलेल्या जादू आणि परदेशातून आणलेले खास नवीन जादूचे प्रयोग बघण्याची सुवर्णसंधी :

वीकेंड गोव्यात खास ३ शोज शनिवार दि. १ मार्च संध्याकाळी ७ वाजता रवींद्र भवन, वास्कोरविवार २ मार्च सायंकाळी ७ वाजता रवींद्र भवन, मडगावसोमवार ३ रोजी संध्याकाळी ७ वाजता कला अकादमी, पणजी येथे आयोजित करण्यात आले आहेत.

नुकतेच युरोप, अमेरिका, सिंगापूर आणि गेल्याच आठवडय़ात फोंडा व साखळी मधील हाऊसफुल्ल शोज नंतर हे ३ खास जादूगार रघुवीर यांचे सहकुटुंब सहपरिवार एन्जॉय करू शकणारे शोज होत असल्याने पालक आणि मुले ह्यांनी निराशा टाळण्यासाठी लवकरात लवकर तिकीट बुक करावी असं आवाहन संयोजक विकास पावसकर आणि प्रतीक जोशी यांच्यातर्फे केले आहे. जादूगार रघुवीर–विजय–जितेंद्र रघुवीर पिता–पुत्रांचा विक्रमी १६०८९, १६०९० आणि १६०९१ वा प्रयोग आहे.

३ महिन्यापूर्वी जादूगार जितेंद्र रघुवीर व्हिएतनाम मध्ये तर गेल्या वर्षी युरोप अमेरिकेत आणि सिंगापूर यशस्वी दौरा करून आले. तिथून आणलेल्या नवीन जादू पण यानिमित्ताने अनुभवता येतील.

या शोचे खास आकर्षण आहे स्टेजवर आक्राळ विक्राळ जापनीज डायनोसोर बरोबर जादूगार जितेंद्र रघुवीर यांची लढत सोबत भुतांचा नाच! या शिवाय या शो मध्ये नवीन पद्धतीने माणसाचे दोन तुकडे करून परत जोडणे, कॅमेरा मॅजिक, जपान ची ३ भुते, रिंग ओ मॅजिक अशा अनेक नवंनवीन जादू तसेच प्रेक्षकातील मुलगी हवेत अधांतरी नोटांचा पाऊस, त्रिशपलह र्त्रीळश्रश्रींळपश, स्टेजवराचा माणूस क्षणार्धात गायब असे एक से एक सरस असे प्रयोग बघायला मिळतील. तिकिटाचे दर खास रु. ५०० आणी रु. ४०० असे ठेवण्यात आले आहेत. तर शालेय विद्यार्थ्यांना तिकिटावर रु. १०० ची खास सवलत देण्यात आली.

# मल्लिकार्जुन देवस्थानात पालखी उत्सव, समुद्रस्नान उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २८ : काणकोण श्रीस्थळ येथील श्री मल्लिकार्जुन देव अडवट सिंहासनाधीश्वर महापती काणकोण देवस्थानचा पालखी उत्सव व समुद्रस्नान मोठ्या उत्साहात झाले. यावेळी उपस्थित हजारो भक्तगणांनी श्रींचे दर्शन व व समुद्राला केळी अर्पण करून ब्राह्मणाला दान दिले. यावेळी असलेल्या करोडो रु. उलाढाल झाली असे एका व्यवसायिकाकडून सांगण्यात आले.

यावेळी मंदिराकडून श्रींच्या नूतन उत्सव मूर्तीचे पालखीतून, पारंपरिक वाद्यघोषासह समुद्रस्नानासाठी प्रयाण झाले.

यावेळी पारंपरिक ठिकाणी तोरणे, सजावट केली जाते. वाटेत एकूण ९ ठिकाणी पारंपरिक ठिकाणी बसका झाल्या. यावेळी उपस्थित शेकडो लोकांनी श्रींचे दर्शन घेतले. राजबाग, तारीर येथील देवावेळ समुद्र किनाऱ्यावर श्रींचे आगमन झाले. मोठ्या उत्साहात श्रींच्या पालखीचे भावीकांकडून स्वागत करण्यात आले.



भाविकांनी मोठ्या संख्येने याठिकाणी उपस्थित राहून श्रींचे समुद्रस्नान मंत्रघोषात झाल्यावर समुद्राला केळी अर्पण करून श्रींचे दर्शन घेतले. समुद्र स्नान करून ब्राह्मणाला दान देण्याची प्रथा यावेळी पाळण्यात आली. श्रींचे समुद्रस्नान आटोपल्यावर सकाळी ९ वा. श्रींचा लवाजम्यासह मुख्यदेवस्थानात परतीचा प्रवास सुरू होऊन दरम्यान ती मुख्य देवस्थानात पोहचली. या ठिकाणी पुजा–अर्चना झाल्यावर प्रसाद वितरण झाले.

पालखीचे आगमन होणार असल्यामुळे याठिकाणी या संपूर्ण प्रवासांत सर्वत्र तोरणे उभारली जातात. कित्येक ठिकाणी सुशोभीकरण केले जाते. समुद्रकिनाऱ्यावर जत्रा भरते. विविध प्रकारच्या दुकानांनी किनारा गजबजतो. अनेक भागातून लोक लवकरच सुरु होणार असलेल्या शिमगोत्सवा निमित्त सामान खरेदी करताना लोक दिसून आले. लोकांनी विक्री करता आणलेले सामान दुपार पर्यंत संपवून घरी परतीच्या मार्गाला लागतात.

# असोसिएशन ऑफ केमिस्ट्री शिक्षक संघटनेचे अधिवेशन, कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. २८ : अधिनियम–गोवा २२व्या वार्षिक अधिवेशनात अलीकडेच आपले २२वे वार्षिक अधिवेशन आयोजित केले. गोवा विद्यापीठाच्या स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस येथे आयोजित या कार्यक्रमामुळे रसायनशास्त्र प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसह २७५ हून अधिक सहभागी झाले होते.

या अधिवेशनाचे उद्घाटन बिट्स–पिलानी, के.के. चे संचालक प्रो. सुमन कुंडू यांनी केले.

जगातील रसायनशास्त्र शिक्षणाचे महत्त्व कुंडूने भर दिला आणि या क्षेत्रात उत्कृष्टतेला चालना देण्याच्या असोसिएशनच्या प्रयत्नांचे कौतुक केले.



या अधिवेशनात डॉ. मिलिंद एस. कुलकर्णी, आरएसओलेकचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, नूतनीकरणयोग्य ऊर्जा आणि इलेक्ट्रॉनिक साहित्य, चेन्नई. डॉ. कुलकर्णी यांनी सेमीकंडक्टर्स सब्सट्रेट उत्पादनांमध्ये अप्लाइड केमिस्ट्रीचे अनुप्रयोग यावर भाष्य केले.

आणखी एक उल्लेखनीय सत्र डॉ. मेनक बॅनर्जी, प्रोफेसर, रसायनशास्त्र विभाग, बिट्स–पिलानी, के.के. यांनी सादर केले. बिर्ला गोवा कॅम्पस, ग्रीन केमिस्ट्री वर. समारोप व बक्षीस वितरण सोहळ्याच्या वेळी डॉ. सुनील कुमार सिंह, सीएसआयआर–नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी, दोना पावला चे संचालक यांनी डॉ. जॉयदीप भट्टाचारजी, राधकृष्ण गावस, श्रीमती सुचित्रा देसाई आणि डॉ. वृंदा बोरकर (अनुपस्थित मध्ये) रसायनशास्त्र परीक्षेत अव्वल असलेल्या विद्यार्थ्यांनाही त्यांनी बक्षिसे दिली.

या अधिवेशनात आंतर–उच्च माध्यमिक रसायनशास्त्र क्विझ, पोस्टर रेखांकन स्पर्धा आणि ३–डी मॉडेल मेकिंग स्पर्धेसह विविध स्पर्धा देखील आहेत. या स्पर्धांच्या विजेत्यांना व्हॅलेडिक्टरी सोहळ्याच्या वेळी बक्षिसे देण्यात आली. वर्ष २०२५–२०२७ साठी नवीन कार्यकारी समिती डॉ. हर्षा उसकईकर यांचा अध्यक्षेखाली निवडन्यात आली.

व्हॅलेडिक्टरी सोहळ्याच्या वेळी डॉ. सुनील कुमार सिंह, सीएसआयआर–नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी, दोना–पावला, डॉ. जॉयदीप भट्टाचारजी, राधकृष्ण गवास, श्रीमती सुचित्रा देसाई आणि सुश्री यांचा समावेश आहेवृंदा बॉर्कर (अनुपस्थित मध्ये) रसायनशास्त्र परीक्षेत अव्वल असलेल्या विद्यार्थ्यांनाही त्यांनी बक्षिसे दिली. हे अधिवेशन एक आश्चर्यकारक यश होते, सहभागींनी गोव्यातील रसायनशास्त्र शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांसाठी आयोजकांचे कौतुक केले.



मडगाव : बार्से– खेडे पंचायत प्रिमियर लीग वॉल स्पर्धेतील सहभागी संघांसोबत चंद्रकांत (बाबू) कवळेकर व शाणू वेळीप.

# वॉलीबॉल प्रिमियर लीग स्पर्धेत ब्रह्मादेवी वॉरियर्स संघ अजिंक्य

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २८ : असोल्डे – बार्से येथील यंग स्ट्रायकर्स स्पोर्टस् अँड कल्चरल क्लबने आयोजित केलेल्या पहिल्या बार्से खेडे पंचायत वॉलीबॉल प्रिमियर लीग स्पर्धेत पाडीच्या ब्रह्मादेवी वॉरियर्सने अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामन्यात त्यांनी सुबदळेच्या युवा सेवा संघावर २–१ सेटनी मात केली. या स्पर्धेत ८ संघांनी भाग घेतला. विजेत्यांना ३० हजार रुपये, तर उपविजेत्यांना २० हजार रुपयांचे बक्षीस प्राप्त झाले. ब्रह्मादेवी वॉरीयर्सचा रुपेश यमकर याला उत्कृष्ट स्मॅशर व निलेश वेळीप याला उत्कृष्ट बचावपटू पुरस्कार मिळाला. युवा सेवा संघाचा राजेश वेळीप याला उत्कृष्ट लिफ्टर पुरस्कार देण्यात आला. शैलीदार खेळाडू पुरस्कार आकाश गावकर याला, तर स्पर्धावीर पुरस्कार प्रेमानंद वेळीप याला मिळाला. उदयोन्मुख खेळाडू पुरस्कार युवा सेवा संघाचा सचिन वेळीप याला देण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमुख्यमंत्री व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत (बाबू) कवळेकर उपस्थित होते.

केपे मतदारसंघात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या क्रीडा स्पर्धांमुळे खेळासाठी उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले आहे. मोबाईलचा जबरदस्त प्रभाव असलेल्या आजच्या युगात मुले व तरुणांचा खेळाकडे ओढा वाढत असल्याचे हे चित्र समाधानकारक व आशादायी आहे, असे कवळेकर यांनी सांगितले. यावेळी पंच शाणू वेळीप, यंग स्ट्रायकर्स क्लबचे अध्यक्ष राजू वेळीप, सचिव नंदेश वेळीप, खजिनदार अरुण गावकर उपस्थित होते.

Statement about ownership and other particulars about 'Dainik Herald' required to be published under Rule 8 of the Registration of Newspapers (Central) Rules 1958

**4/FORM IV**
**(See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. | Place of Publication | : Panaji, Goa. |
| 2. | Periodicity of the Publication | : Daily |
| 3. | 3. Printer's Name | : **Mr Walter Ligorio D'Sousa** |
| | (Whether citizen of India?) | : Citizen of India |
| | (If foreigner, state the country of origin) | : N/A |
| | Address | : A/F-2, Abner Residency, Mesta Bhatt, Merces, Goa |
| 4. | 4. Publisher's Name | : **Mr Walter Ligorio D'Sousa** |
| | (Whether citizen of India?) | : Citizen of India |
| | (If foreigner, state the country of origin) | : N/A |
| | Address | : A/F-2, Abner Residency, Mesta Bhatt, Merces, Goa |
| 5. | Editor's Name | : **Mr Dinesh Keluskar** |
| | (Whether citizen of India?) | : Citizen of India |
| | (If foreigner, state the country of origin) | : N/A |
| | Address | : Yamuna Apartments, Kinai Road, Kankavli City, Dist. Sindhudurg, Maharashtra, Pin - 416602 |
| 6. | Name and address of individuals who own the newspapers and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : **Mrs Laura Fernandes** : **Mr Raul Fernandes** Bairo, Bondir, Santa Cruz, Goa |

I, **WALTER LIGORIO D'SOUSA,** hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date: 01.03.2025

**Signature of Publisher**
**Sd/-**
**Walter Ligorio D'Sousa**

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 177 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .